# श्रेणी सुधार CLASS IMPROVEMENT

❖ श्रेणी/गुणसुधार योजनेनुसार परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी अटी व शर्ती
(अर्ज करण्याची कार्यपध्दती)

(१) ही योजना पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट झालेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

(२) एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेला विद्यार्थीच या योजनेखाली अर्ज करू शकेल. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने स्वतंत्र आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

(३) एकाच वेळेस श्रेणी सुधार आणि तुरळक विषय घेवून (आयसोलेटेड म्हणून) प्रविष्ट होता येणार नाही.

(४) विद्यार्थ्याला त्याने उत्तीर्ण केलेले सर्व विषय घेणे बंधनकारक राहील. नव्याने कोणताही/कोणतेही विषय घेता येणार नाहीत.

(५) विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षेनंतरच्या लगेच लगतच्या परीक्षेसाठीच ही संधी फक्त दोनदा उपलब्ध राहील. उदा. मार्चमध्ये उत्तीर्ण झालेला विद्यार्थी लगतच्या जुलै व मार्च परीक्षेस या योजनेखाली प्रविष्ट होवू शकेल.

(६) विद्यार्थ्याला आधीच्या परीक्षेतील अंतर्गत मूल्यमापन, शालेय श्रेणीच्या विषयांमध्ये मिळालेले गुण/श्रेणी या योजनेखाली होणा-या परीक्षेसाठी ग्राहय धरल्या जातील. (कॅरी फॉरवर्ड) मात्र लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षांचे पूर्वीचे कोणतेही गुण या योजनेमध्ये ग्राहय धरले जाणार नाहीत.

(७) या योजनेखाली प्रविष्ट होताना विद्यार्थ्याला विषय/शाखा,माध्यम,केंद्र,विभाग बदल अनुज्ञेय राहणार नाही.

(८) विद्यार्थी ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून आधीच्या परीक्षेला प्रविष्ट झाला असेल त्याच शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून त्याने आवेदनपत्र सादर करणे आवश्यक राहील व सदर शाळा/कनिष्ठ महाविद्यालय ज्या परीक्षा केंद्राच्या कार्यकक्षेत आहे तेच परीक्षा केंद्र त्याला निवडावे लागेल.

(९) या विद्यार्थ्यांचा निकाल सदर परीक्षेच्या इतर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबर जाहीर केला जाईल.

(१०) निकाल जाहीर झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका घेताना पूर्वी प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारावयाची आहे की नवीन परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारावयाची आहे हा विकल्प (विकल्प फॉर्मच्या नमुन्यात) देण्याचा अधिकार असेल. विद्यार्थ्याला संपूर्ण नवीन किंवा संपूर्ण पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारणे बंधनकारक राहील. काही विषयांचे गुण जुन्या परीक्षेचे व काही विषयांचे गुण नवीन परीक्षेचे अशी मागणी करता येणार नाही. निकाल प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत एक महिन्याच्या आत, त्यांनी श्रेणी सुधार योजने अंतर्गत उत्तीर्णतेची गुणपत्रिका स्विकारण्याबाबत विकल्प अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य राहील. एक महिन्यापर्यंत मागणी केल्यास गुणपत्रिका विनामूल्य देण्यात येईल, व तदनंतरच्या पाच महिने कालावधीपर्यंत नियमानुसार शुल्क आकारून सुधारीत गुण पत्रिका घेता येईल.

(११) विद्यार्थ्यांने या योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यास त्याला यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका मंडळाकडे विकल्पासोबत जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच त्याला सदर योजनेखाली प्रविष्ट परीक्षेची गुणपत्रिका देण्यात येईल. जुन्या परीक्षेची संपादणूक स्वीकारण्याचा विकल्प दिल्यास नवीन परीक्षेची संपादणूक रद्दबातल ठरविण्यात येईल.

(१२) सदरहू योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्याने नवीन गुणपत्रिका स्वीकारण्याचे ठरवल्यास त्या गुणपत्रिकेवर 'श्रेणी सुधार योजनेअंतर्गत'(अंडर क्लास इम्प्रुव्हमेंट स्कीम) असा उल्लेख असेल.

(१३) या योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांसाठी परीक्षाशुल्क नियमित/पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निर्धारित शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारले जाईल. एकदा भरलेले शुल्क परत दिले जाणार नाही.

(१४) जे उत्तीर्ण विद्यार्थी या योजनेनुसार ऑक्टोबर २०१३ मध्ये होणा-या परीक्षेस पुन्हा प्रविष्ट होवू इच्छितात त्यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधावा. कनिष्ठ महाविद्यालयाने संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधून आवश्यक तेवढया आवेदनपत्रांची मागणी करून मंडळाच्या सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

(१५) विद्यार्थ्याने गुणपडताळणीसाठी अर्ज केला असेल व गुणपडताळणीच्या निकालामुळे विद्यार्थ्याचे समाधान झाले असल्यास श्रेणीनुसार योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ठ व्हायचे किंवा नाही हा निर्णय पूर्णतः त्या विद्यार्थ्याचा असेल.